Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१
दूरध्वनी: +९१–२२–३५५५ ५००० • फॅक्स: +९१–२२–३५५५ ५१११ • ई–मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

## (कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

**विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन अँण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) प्राधिकरणात हस्तांतरण**

इन्व्हेस्टर एज्युकेशन अँण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरण (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन अँण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.**

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१०–११ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने आता, आर्थिक वर्ष २०१९–२० मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित सर्व भागधारकांना योग्य कार्यवाही करण्यासाठी दिनांक ८ एप्रिल २०१९ च्या पत्राद्वारे व्यक्तिगत आणि संबंधित भागधारकांना कळविले आहे.

**कंपनीने आपल्या वेबसाईटवर (www.ril.com) आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला असून भागधारकांना http://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx ही वेब–लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.**

**भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले समभाग, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, यांचा ते आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.**

**प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमांनुसार आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.**

संबंधित भागधारकांनी १२ जुलै, २०१९ पर्यंत कंपनीला काहीही न कळविल्यास, ह्या नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी, नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या पद्धतीनुसार अंतिम मुदतीच्या तारखेला समभाग डिमटिरिअलाईज करण्याची आणि आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरणाची कार्यवाही कंपनीद्वारे करण्यात येईल.

भागधारकांना ह्या संदर्भात आणि नियमाविषयी काही शंका निरसन करायची असल्यास, त्यांनी श्री. एस्. पी. वेणुगोपाल, जनरल मॅनेजर, **कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड,** कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजन्टस् यांच्याशी कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१–३२, गचीबॉवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, **दूरध्वनी:** + ९१–४०–६७१६ १७००, **फॅक्स:** + ९१–४०–६७१६ १६८०, **टोल फ्री क्र:** १८००–४२५–८९९८,(सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) **ई–मेल:** rilinvestor@karvy.com येथे संपर्क साधावा.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/–
के. सेथुरामन
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंम्पलायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : १५ एप्रिल, २०१९